जाक्र/शिउस/पुवि/इन्स्पायअ/२०१३-२०१४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय,
दिनांक : १५.९.२०१४

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य (सर्व)
पुणे विभाग.

**विषय : राज्यस्तरीय इन्स्पायर ॲवार्ड विज्ञान प्रदर्शनाबाबत.**
**दि. १८.९.२०१४ ते दि. २०.९.२०१४**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, राज्यस्तरीय इन्स्पायर ॲवार्ड विज्ञान प्रदर्शन दिनांक दि. १८.९.२०१४ ते दि. २०.९.२०१४ या कालावधीत **विश्वशांती गुरुकुल राजबाग, लोणीकाळभोर** ता.हवेली जि.पुणे (एम.आय.टी) या ठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रदर्शनात विविध वैज्ञानिक उपक्रम, प्रतिकती सादर करण्यात येणार आहे. त्याअन्वये सदर प्रदर्शनास भेट देणेसाठी खालीलप्रमाणे नियोजन करणेत आलेले आहे.

| अ.क्र | दिनांक | भेट देणा-या शाळांचा विभाग | सत्र |
|---|---|---|---|
| १ | १८/९/२०१४ | पुणे शहर | दु. २.०० ते ५.३० |
| २ | १९/९/२०१४ | पुणे ग्रामीण सर्व | स.१०.३० ते ५.३० |
| ३ | २०/९/२०१४ | पिंपरी चिंचवड शहर | स.१०.३० ते १.०० |

**प्रदर्शन स्थळी भेट देताना पुढील सूचनांचे पालन करावे.**
१) विदयार्थ्यांची वाहतूक व्यवस्था सुरक्षित वाहनांनी करावी. प्रदर्शनस्थळी विदयार्थ्यांची सुरक्षितता पहावी.
२) प्रदर्शनस्थळी येणा-या विदयार्थ्यांची व शिक्षकांची यादी सोबत सादर करावी.
३) विदयार्थ्यांना पाण्याची बाटली सोबत आणण्यास सांगावे.
४) प्रदर्शनस्थळाच्या आवारातील झाडांची पाने / फुले तोडू नयेत.
५) परिसरातील कुठल्याही बाबींचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी

सदर प्रदर्शन कालावधीत आपला शिक्षक वृंद व विदयार्थ्यांसाठी **प्रसिध्द अशा राजबोगतील राजकपूर मेमोरियल ,तसेच विश्वशांती संगीतकला अकादमी यांची दालने सर्वांसाठी खुली ठेवण्यात येणार आहेत. त्याचबरोबर प्रतिथयश दिग्दर्शक व कलाकार यांचे कर्मभूमी असलेला निसर्गरम्य राजबाग लोणीकाळभोर परिसर आपणासं पहावयास मिळेल.** आपण येण्यापूर्वी खालील मोबाइल क्रमांकावर फोन करुन वेळ व दिनांक कळवावी त्यानुसार प्रदर्शनस्थळी व्यवस्था करता येईल.

**संपर्क क्रमांक १) शिरीष करजगी - ९०११०२५३३४ , २) दिलीप पाटील - ८३०८४५३६००**

सही/-
१५/९/१४
**( सुमन शिंदे )**
**शिक्षण उपसंचालक ,**
पुणे विभाग ,पुणे .